संकलित मूल्यमापन - १ (प्रथमसत्र २०१८-१९) प्रश्नपत्रिका

इयत्ता - ८वी    विषय - मराठी (LL)    पूर्णांक - ५०

प्रश्न क्र. १ (अ) खाली दिलेला उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर दिलेल्या पर्यायातून शोधून लिहा.

आता तुम्हांला माझीच गोष्ट सांगतो. माझं प्राथमिक शिक्षण एक लहानशा खेड्यात झालं. माझं खेडं अतिशय निसर्गरम्य आणि सुसंस्कृत होतं. घनदाट जंगल, दुथडी भरून वाहणारी नदी, निळे डोंगर, हिरवी रानं, अवघा आनंदी आनंद! अशा वातावरणात माणसातली सर्जनशीलता उफाळून आली नाही तर नवलच! माझा एक मित्र होता. आम्हांला खूप वाटायचं, की आपण चित्रं काढावीत; पण काय करणार? आमच्याकडे कसलीच साधनं नव्हती. पेन्सिल, रंग, ब्रश हे तर सोडाच, साधा कागदही नव्हता. अभ्यासाची एकच वही. पाटीवर लिहिण्याची एक पेन्सिल. तिचे तुकडे झाले, तरी सांभाळून वापरावी लागायची. दुसरी मिळण्याची शक्यता नव्हती.

(अ) लेखकाने उताऱ्यात कले संबंधी वर्णिलेले विषय ... ①

① मूर्तिकला ② संगीतकला ③ चित्रकला ④ गायनकला

(ब) चित्र काढण्यासाठी लागत असलेले साधन ... ①

① रंग ② ब्रश ③ कॅनवास ④ दिलेले सर्व साधनं.

(क) गटात न बसणारा शब्द ओळखा. ①

① चित्र ② रंग ③ ब्रश ④ साधा

(ड) पेन्सिल सांभाळून वापरावी लागायची कारण - - - ②

① दुसरी मिळण्याची शक्यता नव्हती ② पेंसिल महाग होती

③ खेडं अतिशत दुर्गम स्थानावर होते ④ खेडेत दुकान नव्हती

(इ) खेड्याची वैशिष्ट्ये - - - ②

① शहर चे नाजिक ② काही ही वैशिष्ट्ये नाही

③ लहानशा, निसर्गरम्य, सुसंस्कृत ④ निसर्गापासून लांब दूरीवर.

(ब) दिलेला उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर दिलेल्या पर्यायातून शोधून लिहा.

कावळ्या किल्ला तसा बराच मोठे आहे. तो फोडूनच वरंधा घाटाच्या शेवटचा टप्पा तयार केला आहे. श्री वाघजाई मंदिराच्या बरोबर वरच्या भागात डोंगरमाथ्याजवळ नऊ टाक्यांचा समूह आहे. कोणे एके काळी तो कावळ्या किल्ल्याचा एक भाग होता. भजी-वडे चहाच्या टपऱ्यांच्या बाजूने अवघ्या दहा-पंधरा मिनिटांतच इथं जाऊन पोहोचता येतं. पाण्याला जीवन का म्हणतात? ते इथे आल्यावर कळतं. काळ्याशार पाषाणात खोदलेली पाण्याची ती टाकी कित्येक वर्षे कित्येकांची तहान भागवत असतील कोण जाणे. ओल्या वाटेने परत जाताना अंगावरचे कपडे हम खास रंगतात, कारण पायवाटच तशी रंगीली आहे.

(अ) ........ फोडूनच वरंधा घाटाच्या शेवटचा टप्पा तयार केला आहे. (1)
रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.
(1) टपऱ्या (2) घर (3) दुकान (4) कावळ्या किल्ला

(ब) 'पायवाट' हा शब्दाचे लिंग ओळखा. (1)
(1) पुल्लिंग (2) नपुंसक (3) स्त्रीलिंग (4) कोणतेही नाही.

(क) वाघजाईच्या मंदिराच्या वरचा भागात डोंगर माथ्याजवळ असलेल्या (1)
........
(1) दहा टाक्यांचा समूह (2) नऊ टाक्यांचा समूह
(3) किल्ला (4) मंदीर.

(ड) ........ या देवीच्या सोबतीने उभारलेल्या टपऱ्या. (1)
(1) मुंबा देवी (2) अंबाबाई (3) श्रीवाघजाई (4) काळिमाता

(इ) 'बाहेर बरसणारा पाऊस होता.' या वाक्यातून क्रिया (1)
विशेषण शब्द ओळखा.
(1) पाऊस (2) बाहेर (3) होता (4) बरसणारा

(ई) टपऱ्यांमधून मिळणारा खादय पदार्थ .... (1)
(1) राजेशाही खाना (2) ऊसळभात (3) वडे-चहा (4) पुरी-भाजी.

प्रश्न 2 (अ) दिलेली कवितेचे वाचन करून विचारलेल्या प्रश्नांचे
उत्तर दिलेल्या पर्यायातून शोधून लिहा.

पायाभरणी अस्तित्वाची, प्रयोगशाळा व्यक्तित्वाची,
तन सुदृढ, मन विशाल होई, इथे रूजवडूक या तत्वांची,
विचारधारा तीच वाहते नसानसांत, रगारगांत,
कला गुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची प्रभात,
नवीन स्वप्ने, नवीन आशा, ही प्रगतीची नव परिभाषा
परिश्रमाने अभ्यासाने उन्नत बनवू आपुल्या देशा.
मिटवून सारे भेद चला रे मानवतेच्या युगात,
कला गुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची प्रभात.

(क) कला गुणांच्या क्षितिजावर प्रतिभेची पहाट उगवली, कारण .... (2)
(1) सूर्योदय होऊन सकाळ झाली. (2) नवे युग उजाडले.
(3) ज्ञानाचे तेज नव्या युगाच्या नभात पसरले.
(4) पक्ष्यांचा चिवचिवाट सुरू झाला.

(ख) कवीच्या मते 'मानवतेचे युग' म्हणजे .... (2)
(1) मानवांचे युग (2) नव्या विचारांचे युग
(3) माणसाच्या प्रगतीचे युग (4) भेदाभेद नसलेले युग.

Scanned by CamScanner

(इ) पायाभरणी कशाची ? ①
① फुला - पाखरांचे ② आपुलकीचा ③ अस्तित्वाची ④ गुरुजनांची
(ई) प्रतिभेची प्रभात कोणत्या क्षितिजावर आली आहे ? ②
① प्रयोगशाला ② गुरुजनांची ③ कलागुणांच्या ④ परिश्रमाचे

(आ) खाली दिलेली कविता वाचून विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर दिलेल्या पर्यायातून शोधून लिहा.

आभाळाची आम्ही लेकरे, काळी माती आई
जात वेगळी नाही आम्हा धर्म वेगळा नाही ॥
श्रमगंगेच्या तीरावरती कष्टकऱ्यांची अमुची वसती
नाव वेगळे नाही आम्हा गाव वेगळा नाही ॥
इमान आम्हा एकच ठावे घाम गाळुनी काम करावे
मार्ग वेगळा नाही आम्हा स्वर्ग वेगळा नाही ॥
माणुसकीचे अभंग नाते अम्हीच अमुचे भाग्यविधाते
पंथ वेगळा नाही आम्हा संत वेगळा नाही ॥
कोटि कोटि हे बळकट बाहू जगन्नाथ-रथ ओढून नेऊ
आस वेगळी नाही आम्हा ध्यास वेगळा नाही ॥

(च) कवितेतील 'आत्मविश्वास' व्यक्त करणाऱ्या काव्यपंक्ती लिहा. ②
① घाम गाळुनी काम करावे ② अम्हीच अमुचे भाग्यविधाता
③ जगन्नाथ-रथ ओढुन नेऊ ④ उपरोक्त सर्व.

(छ) कवितेतील 'ऐक्याचा' संदेश देणाऱ्या काव्यपंक्ती लिहा. ②
① इमान आम्हा एकच ठावे ② कोटि कोटि हे बलकट बाहू
③ घाम गाळुनी काम करावे ④ आभाळाची आम्ही लेकरे.

(ज) कोटी कोटी हातांना हा ओढणार आहे → ②
① जगन्नाथाचा रथ ② माणुसकीचे नाते ③ इमान ④ स्वर्ग

(झ) चौकटात येणारे शब्द ②

आम्ही → लेकरे याची → [ ]
आम्ही → आमची आई → [ ]

① कष्टकऱ्यांची, श्रमगंगे ② जगन्नाथ, माणुसकी ③ आभाळाची, काळीमाती.
④ पंथ, संत।

प्रश्न 3 (अ) पुढील वाक्यप्रचाराचा अचूक अर्थ लिहा.
Ⓘ हिरमोड होणे ------ ①
① कचरा काढणे ② नाराज होणे ③ खर्च करणे ④ गडप होणे.
Ⓘⓘ कुरकुर करणे - ........ ①
① भूक लागणे ② वाईट वाटणे ③ तक्रार करणे ④ दंग होणे

(आ) दिलेल्या शब्दांचे लिंग ओळखा.
Ⓘ जंगल — ..... ①
① स्त्रीलिंग ② पुल्लिंग ③ नपुंसक लिंग ④ कोणते ही नाही
Ⓘⓘ पाटी - .... ①
① स्त्रीलिंग ② पुल्लिंग ③ नपुंसकलिंग ④ कोणते ही नाही.

Scanned by CamScanner

(इ) पुढील वाक्यप्रकार ओळखा आणि त्याचे क्रमांक लिहा.

(I) मुलांनो, रांगेत चला. ①

① प्रश्नार्थी वाक्य ② आज्ञार्थी वाक्य ③ विधानार्थी वाक्य ④ उद्‌गारार्थी वाक्य.

(II) तुला पेढा आवडतो का ? ①

① आज्ञार्थी वाक्य ② विधानार्थी वाक्य ③ प्रश्नार्थी वाक्य ④ उद्‌गारार्थी वाक्य.

(ई) अचूक शब्द ओळखा आणि त्यांचे क्रमांक लिहा. ①

(I) मुरूम / मुरम / मूरूम / मूरम.

① मुरूम ② मुरम ③ मूरूम ④ मूरम ①

(II) आनंद / अनंद / आणंद / आंनद

① अनंद ② आनंद ③ आंनद ④ आणंद ①

③ विराम चिह्ने (?) ओळखा व लिहा.

① पूर्ण विराम ② प्रश्नचिह्न ③ उद्‌गारचिह्न ④ स्वल्पविराम

प्रश्न ४ (अ) जसा गाईचा गोठा, तसे →

(I) घोड्याचा → ☐ ①

① खुराडे ② गोठा ③ तबेला ④ घर

(II) कोंबडीचे → ☐ ①

① गोठा ② सदन ③ खुराडे ④ तबेला.

(आ) 'भरभर, सावकाश, सतत' कोणते अव्यय आहे लिहा. ①

① शब्दयोगी अव्यय ② उभयान्वयी अव्यय ③ क्रियाविशेषण अव्यय

④ केवलप्रयोगी अव्यय.

(इ) 'श्रम' – या शब्दाचा समानार्थी शब्द लिहा. ①

① शर्म ② लाज ③ कष्ट ④ भाग्य

(ई) 'बळकट' या शब्दाचा विरुद्ध अर्थाचे शब्द लिहा. ①

① बलवान ② कमकुवत ③ दुर्जन ④ माणुसकी

(उ) 'ढलपी' या शब्दाचे अनेकवचन दिलेल्या क्रमांकातून लिहा. ①

① ढलपे ② ढलप्या ③ ढलप ④ कोणते ही नाही.

(ऊ) वाक्यांचे प्रकार ओळखा.

मी चांगला अभ्यास केल्यामुळे पास झालो. ①

① केवल वाक्य ② मिश्रवाक्य ③ संयुक्त वाक्य ④ कोणते ही नाही

Scanned by CamScanner

प्रश्न 5 खालील बातमी वाचून दिलेल्या प्रश्नांचे उत्तर दिलेल्या पर्यायातून शोधून लिहा.

दिनांक : 20 डिसेंबर

लोकप्रतिभा

चित्रकला शिबिराचा समारोप

उत्रौली (ता. भोर) : उत्रौली येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत दहा दिवसांचे चित्रकला शिबिर नुकतेच संपन्न झाले. 19 डिसेंबर रोजी दुपारी 4.00 ते 6.00 या वेळात शिबिराचा समारोप समारंभ साजरा झाला. या शिबिराचा सांगता प्रसिद्ध चित्रकार श्री. अविनाश शिवतरे यांच्या सप्रात्यक्षिक मनोगताने करण्यात आली.

आपल्या जीवनातील कलेचे महत्त्व सांगताना प्रत्येकाने कोणती-ना-कोणती कला शिकणे आवश्यक आहे, हा विचार त्यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केला. समारंभाचे अध्यक्ष स्थान प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री. सदाशिव शिंदे यांनी भूषवले. कला शिक्षिका श्रीमती सुनीता सोमण यांनी प्रमुख पाहुणे व उपस्थितांचे आभार मानले.

या निमित्ताने सर्व पंचवीस शिबिरार्थींच्या चित्रांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. त्याला रसिकांचा उदंड प्रतिसाद मिळाला.

(अ) समारंभाचे प्रमुख पाहुणे कोण – ①

① श्री अविनाश शिवतरे ② श्रीमती सुनीता सोमण ③ श्री सदाशिव शिंदे ④ या पैकी कोणी नाही.

(ब) चित्रकला प्रदर्शनास प्रतिसाद देणारे – ①

① चित्रकार ② मुख्याध्यापक ③ शिबिरार्थी ④ रसिक

(क) शिबिरार्थींची संख्या किती होती? ①

① वीस ② सतरा ③ पंचवीस ④ एकोणवीस

(ड) शिबिरार्थींनी शिबिरात शिकलेली कला – ①

① मूर्तीकला ② संगीत कला ③ चित्रकला ④ गायन कला.

(इ) शिबिर सुरू झाले ती तारीख कोणती? ①

① 20 डिसेंबर ② 21 डिसेंबर ③ 19 डिसेंबर ④ 22 डिसेंबर

(ई) समारंभाचे अध्यक्ष कोण होते? ①

① श्री अविनाश शिवतरे ② श्रीमती सुनीता सोमण ③ शिबिरार्थी ④ श्री सदाशिव शिंदे

Scanned by CamScanner